कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया करताना
सुरक्षितता, सावधानता आणि मार्गदर्शक
तत्वे यांचे पालन करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय क्रमांक कुशत २००५/प्र.क्र.१३०यकु.क.३
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : २९ एप्रिल, २००५

वाचा :-
१) शासन निर्णय सार्वजनिक आरोग्य विभाग क्रमांक एफएफपी १३८८/१३५४/सीआर२३१/कु.क.३, दिनांक २५ जानेवारी, १९९१
२) शासन निर्णय सार्वजनिक आरोग्य विभाग क्रमांक एफएफपी १३८८/१३५४/सीआर२३१/कु.क.३, दिनांक २ नोव्हेंबर, १९९१
३) शासन निर्णय सार्वजनिक आरोग्य विभाग क्रमांक कुकका १०९६/सीआर८५/एफ.डबल्यू-४, दिनांक २३ ऑक्टोबर, १९९६
४) शासन निर्णय सार्वजनिक आरोग्य विभाग क्रमांक कुकका १०९६/सीआर८५/एफ.डबल्यू–४, दिनांक २६ फेब्रुवारी, १९९७
५) शासन जोडपत्र सार्वजनिक आरोग्य विभाग क्रमांक कुकका १०९६/सीआर८५/एफ.डबल्यू-४, दिनांक २ मे, १९९७
६) सर्वोच्च न्यायालय रिट याचिका (नागरी) क्रमांक २०९/२००३ प्रकरणी, दिनांक १ मार्च, २००५ रोजी दिलेले आदेश.

**शासन निर्णय :** सन २००३ साली रमाकांत राय आणि इतर यांनी मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या रिट याचिकेत असा दावा केला की, केंद्र शासनाच्या आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाने स्त्री व पुरूष नसबंदी शस्त्रक्रियासंबंधीच्या विहित मार्गदर्शक तत्वांचे राज्यांकडून पालन केले जात नाही. परिणामी आरोग्य व सुरक्षितता मानकांमध्ये तडजोड केली जाते व रूग्णांच्या जिवितास धोका होतो असा आरोप केला होता.

२. वादींची आणि राज्य शासनांची बाजू ऐकल्यानंतर मा. सर्वोच्य न्यायालयाने दिनांक १ मार्च, २००५ रोजी सर्व राज्यांना अंतरिम आदेश दिले आहेत. सदर आदेशांचे पालन करण्यासाठी खालील सूचना/मार्गदर्शक तत्वे निर्गमित करण्यात येत आहेत :-

(१) (अ) आयुर्विज्ञान पारंगत (एम.डी.), स्त्री रोग व प्रसुति शास्त्रज्ञ किंवा स्त्री रोग व प्रसुति शास्त्राची पदविका धारण करणारे डॉक्टर्स पुरूष नसबंदी शस्त्रक्रिया, बिनटाक्याची पुरूष नसबंदी शस्त्रक्रिया (Non-Scalpel Vasectomies), मिनि लॅप स्त्री नसबंदी शस्त्रक्रिया आणि दुर्बिणीव्दारे करण्यात येणाऱ्या शस्त्रक्रियां नियमितप्रमाणे करण्यास सक्षम राहतील.

(कृ.मा.प.)

(ब) पदव्युत्तर शैक्षणिक पात्रता धारण करणारे उदा. मास्टर ऑफ सर्जरी (शल्य चिकित्सा) डॉक्टर्स विनिर्दिष्ट प्रशिक्षणानंतरच दुर्बिणीव्दारे करण्यात येणाऱ्या कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया करण्यास सक्षम राहतील मात्र, वर नमूद केलेल्या इतर शस्त्रक्रिया सदर डॉक्टरांना करता येतील.

(क) एम.बी.बी.एस. पदवी धारण करणारे डॉक्टर्स विशिष्ट प्रशिक्षण घेतल्यानंतर व पाच वर्षांच्या अनुभवानंतर पुरूष नसबंदी शस्त्रक्रिया, बिनटाक्याची पुरूष नसबंदी शस्त्रक्रिया (Non-Scalpel Vasectomies) आणि मिनि लॅप स्त्री नसबंदी शस्त्रक्रिया नियमितपणे करू शकतील. एम.बी.बी.एस पदवी धारक डॉक्टरांना दुर्बिणीची कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया करता येणार नाहीत.

(२) जिल्हा आरोग्य अधिकारी जिल्हा परिषद, जिल्हा शल्य विशारद सामान्य रूग्णालय, आणि महानगरपालिकांचे डॉक्टरांनी त्यांच्याशी संबंधित विभागामध्ये पुरूष आणि स्त्री नसबंधी शस्त्रक्रिया करण्यासाठी वरील निकष आणि शैक्षणिक पात्रता विचारात घेवून प्रमाणित केलेल्या डॉक्टरांची नामिका (Panel) तयार करतील.

(३) राज्यात सध्या उपलब्ध असलेली वैद्यकीय प्रकरण पत्रिका कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया करण्यापूर्वी शल्य विशारदांनी न चुकता भरावी आणि त्यावर स्वाक्षरी करावी. या व्यतिरिक्त सहपत्र-१ येथे जोडलेली तपासणी यादीसुद्धा शल्य विशारदांनी कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया करण्यापूर्वी भरावी आणि त्यावर स्वाक्षरी करावी. कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया सुरू करण्यापूर्वी वरील कार्यपद्धतीचे पालन केले जाईल याची काळजी घेण्यात यावी.

(४) राज्यात सर्व आरोग्य संस्थांकडे उपलब्ध असलेले रूग्णाचे संमतीपत्र कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया करण्यापूर्वी भरण्यात यावे. सदर संमती पत्रिका रूग्णास समजावून सांगण्यात यावी आणि त्यावर रूग्णाची स्वाक्षरी किंवा अंगठा घेण्यात यावा.

(५) या व्यतिरिक्त सहपत्र-२ येथे जोडलेली इंग्रजी भाषेतील संमती पत्रिका मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार स्विकारण्यात आलेली आहे. सदर पत्रिकेत नमूद करण्यात आले आहे की, कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया कार्यपद्धत अयशस्वी झाली आहे आणि रूग्ण गर्भवती झाल्यास अशा रूग्णास रूपये ५०००/- नुकसान भरपाई मोबदला देण्यात येईल. सदर नुकसान भरपाई मोबदला पत्रिकेत नमूद केलेल्या शर्तीच्या अधीन राहून अदा करण्यात येईल. रूग्णास सर्व तरतूदी समजावून सांगणे आवश्यक आहे आणि त्यानंतर लाभार्थीची संमतीपत्रिकेवर स्वाक्षरी घेण्यात यावी. संमतीपत्र पूर्ण केल्याशिवाय कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया सुरू करू नये. जर रूपये ५,०००/- मोबदला द्यावयाचा झाल्यास, परिच्छेद-६ मध्ये नमूद केलेल्या लेखाशिर्षाखाली उपलब्ध असलेल्या तरतूदीतून निधी मिळविण्यात यावा.

३. कुटुंब नियोजन शस्त्रक्रियांची गटनिहाय, वयिनहाय आणि अपत्यिनहाय विभागणी केलेली माहिती, कुटुंब नियोजन शस्त्रक्रियेनंतर मृत्यु व गुंतागुंतीची प्रकरणे या माहितीसह कुरियर सेवेव्दारे दरमहा अहवाल अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा, कुटुंब कल्याण, पुणे यांना पाठविण्यात यावा. सदर माहिती सोबत जोडलेल्या प्रपत्र-३ मध्ये भरून पाठवावी.

....३/....

४. राज्य स्तरीय आणि विभागीय स्तरीय गुणवत्ता अभिवचन समिती शासन निर्णय सार्वजनिक आरोग्य विभाग दिनांक २५ जानेवरी, १९९१ अनुसार कार्यरत आहे. विभागीय गुणवत्ता अभिवचन समितीने कुटुंब नियोजन शस्त्रक्रियांसंबधी दिलेल्या सूचनांचे पालन प्रत्येक आरोग्य संस्था आणि शल्य विशारद करीत आहेत याची खात्री करावी. सदर आदेशांचे भंग करणाऱ्या डॉक्टर्स आणि संबंधित सर्व कर्मचारी वृंद गंभीर दंडास प्राप्त राहतील. कुटुंब नियोजन शस्त्रक्रियेनंतर मृत्यु झाल्यानंतर त्याची चौकशी चालू असताना शल्य विशारदास आणखी शस्त्रक्रिया करण्यास बंदी घालण्यात येईल आणि त्याचे नांव डॉक्टर्सच्या नामिकेवरून (Panel) कमी करण्यात येईल. सदर डॉक्टरला शस्त्रक्रिया करण्यास पुनःश्च परवानगी, चौकशीत निर्दोष आढळल्यास आणि त्याचे निषकर्ष राज्य गुणवत्ता अभिवचन समितीने मान्य केल्यानंतर, देण्यात येईल.

५. मा.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार राज्य गुणवत्ता अभिवचन समिती खालीलप्रमाणे सुधारीत करण्यात येत आहे :-

| | | |
|---|---|---|
| १) | सचिव/प्रधान आणि आयुक्त कुटुंब कल्याण | : अध्यक्ष |
| २) | महासंचालक, आरोग्य सेवा | : उपाध्यक्ष |
| ३) | विभाग प्रमुख, शल्य चिकित्सा, लोकमान्य टिळक महानगरपालिका रूग्णालय/सायन रूग्णालय, मुंबई | : सदस्य |
| ४) | विभाग प्रमुख, प्रसूती व स्त्री रोग तज्ञ, नायर रूग्णालय, मुंबई | : सदस्य |
| ५) | विभाग प्रमुख, विकृती चिकित्सा, ग्रँट वैद्यकीय महाविद्यालय, मुंबई | : सदस्य |
| ६) | विभाग प्रमुख, भूलतज्ञ, ग्रँट वैद्यकीय महाविद्यालय, मुंबई | : सदस्य |
| ७) | विभाग प्रमुख, औषध वैद्यक, जी.एस.शेठ वैद्यकीय महाविद्यालय, मुंबई | : सदस्य |
| ८) | मूत्रविकार तज्ञ, ग्रँट वैद्यकीय महाविद्यालय, मुंबई | : सदस्य |
| ९) | उप संचालक, आरोग्य सेवा, विभागीय मंडळ (संबंधित) | : सदस्य |
| १०) | अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा, कुटुंब कल्याण, पुणे | : सदस्य सचिव |

फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया, फेडरेशन ऑफ ऑबस्टेरिक्स अॅण्ड गॉयनोक्लोजिस्टस् सोसायटी ऑफ इंडिया यांसारखे व्यावसायिक संस्थांचे प्रतिनिधींचा निमंत्रित म्हणून समावेश करता येईल.

राज्यस्तरीय गुणवत्ता अभिवचन समितीच्या कार्यासंबंधीच्या तपशीलवार सूचना निर्गमित करण्यात येत आहेत. त्याचप्रमाणे विभागीय स्तरीय गुणवत्ता अभिवचन समितीची रचना, कार्य आणि कालावधी याबाबत स्वतंत्रपणे आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

....४/....

६. कुटुंब नियोजन शस्त्रक्रियेनंतर मृत्यु झाल्यास कायदेशीर वारसदारांना सानूग्रह अनूदान देण्याबाबत :-

सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार आणि केंद्र शासनाकडून पुढील सूचना मिळेपर्यंत राज्य शासन कुटुंब नियोजन शस्त्रक्रियेशी निगडोत मृत्यु झालेल्या रूग्णांच्या कायदेशीर वारसदारांना विभागीय गुणवत्ता अभिवचन समितीने पुष्टी केल्यानंतर रूपये १.०० लाखाचे सानुग्रह अनुदान देण्यात यावे. रूपये १०,०००/- रोख स्वरूपात आणि उरलेले रूपये ९०,०००/- राष्ट्रीय बचत प्रमाणपत्राच्या स्वरूपात अदा करण्यात येतील. रूपये १,००,०००/- सानुग्रह अनुदान देण्याचा खर्च खालील लेखाशिर्षाखाली मंजूर केलेल्या तरतूदीतून करण्यात यावा:

| | |
|---|---|
| मागणी क्रमांक | : आर - १ |
| मुख्य शिर्ष | : २२११ कुटुंब कल्याण |
| गौण शिर्ष | : १०५-नुकसान भरपाई–<br>१०० टक्के केंद्र पुरस्कृत योजना– |
| उप शिर्ष | : (०१) (०१) निर्बिजीकरण व गर्भाशयांतर्गथ रोगांसाठी नुकसानभरपाईची व विशेष सेवा |
| उदिष्ट | : १२ व्यावसायिक व विशेष सेवा |
| लेख्याचे शिर्ष | : (२२११ ०२३८) |

तसेच, जर कुटुंब नियोजन शस्त्रक्रियेनंतर रूग्णास असमर्थता किंवा अपंगत्व आल्यास विभागीय गुणवत्ता अभिवचन समितीने पुष्टी केल्यानंतर रूपये ३०,०००/- सानुग्रह अनुदान देण्यात यावे. हा खर्च वर नमूद केलेल्या लेखाशिर्षाखालील अनुदानातून भागविण्यात यावा.

कुटुंब नियोजन शस्त्रक्रियेनंतर गुंतागुंत झाल्यास, रूग्णांनी प्रयोगशाळेतील पाचण्या व औषधांवर केलेल्या खर्चाची प्रतिपूर्ती रूपये २०,०००/- पर्यंत करता येईल. तथापि सदर अनुदानास विभागीय गुणवत्ता अभिवचन समितीची प्रथमत: मान्यता घेण्यात यावी वर नमूद केलेल्या लेखाशिर्षाखालील अर्थसंकल्पिय अनुदानातून कर्च भागविण्यात यावा.

७. मृत व्यक्तिचे नातेवाईक काही वेळा अधिक नुकसान भरपाई मिळावी म्हणून न्यायालयात दावे दाखल करतात तर काही वेळा वादीच्या बाजूने आदेश पारीत केले जातात. ही बाब विचारात घेता व मा. सर्वोच्च न्यायालयाचे अलिकडील निर्देश पहाता, राज्य सरकार सर्व पक्षकारांना परस्पर कायदेशीर होईल आणि मृत व्यक्तीस सुद्धा न्याय मिळेल अशी विमा पत्र योजना अंतिम करणार आहे. या विषयी स्वतंत्र आदेश भारत सरकारच्या अंतिम मान्यतेच्या अधीन राहून निर्गमित करण्यात येतील.

....५/....

सदर आदेश शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक डिएफपी ११७१/६४२/रोमन नऊ/दिनांक १९ मार्च, १९७१ अन्वये सचिव, आरोग्य यांना प्रदान केलेल्या शक्तीनुसार निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

सं.चं.मोंडकर
महाराष्ट्र शासनाचे अवर सचिव

प्रति,
अपर मुख्य सचिव, सार्वजनिकआरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई
महासंचालक, आरोग्य सेवा, मुंबई
सर्व विभागीय आयुक्त
सर्व आयुक्त, महानगरपालिका
सर्व जिल्हाधिकारी
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा, कुटुंब कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
सहसंचालक, आरोग्य सेवा (आरोग्य), महाराष्ट्र राज्य, पुणे.
सहसंचालक, आरोग्य सेवा (पीडीई), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सहसंचालक, आरोग्य सेवा (रूग्णसेवा), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सर्व उपसंचालक, आरोग्य सेवा, विभागीय मंडळे.
मुख्य लेखा व लेखा परिक्ष अधिकारी, सहसंचालक, आरोग्य सेवा (आरोग्य) यांचे कार्यालय, पुणे.
सर्व जिल्हा शल्य चिकित्सक, सामान्य रूग्णालय.
सर्व जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद.
सर्व अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय.
वैद्यकीय आरोग्य अधिकारी, महानगरपालिका (सर्व).
विशेष अधिकारी, कुटुंब कल्याण युनिट, बृहन्मुंबई महानगरपालिका, परळ, मुंबई ४०० ०१२.
प्रधान सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
सचिव, भारत सरकार, आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय, कुटुंब कल्याण विभाग, निर्माण भवन, नवी दिल्ली.
उप सचिव / अवर सचिव (कार्यासन सेवा - ४), सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
समितीचे सर्व सदस्य.
सचिव, आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय, कुटुंब कल्याण विभाग, निर्माण भवन, नवी दिल्ली.
निवडनस्ती, कु.क.३.

सेटा/एच-435 (600-5-2005)-3